# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १२/१२/२०१७

## गट्टा (जांभिया) गावकऱ्यांनी केली ०७ भरमार रायफल जमा

पोलीस अधिक्षक सो. गडचिरोली सांच्या वतींने गडचिरोली जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानातंर्गत पोमके गट्टा (जां) यांनी केलेल्या आवाहानाला प्रतिसाद देवून आज रोजी नक्षलदृष्या अतिदुर्गम भागातील मौजा हिक्केर व मौजा हिंदुर येथील ग्रामस्थांनी त्यांच्या कडील ०७ भरमार रायफल व ०१ भरामार नळी पोमके गट्टा (जां) येथे प्रभारी पोलीस अधिकारी पोउपनि योगेश दाभाडे यांच्या समोर जमा करुन विकासाच्या मुख्य प्रवाहात सामाविष्ठ होण्याचा निर्णन घेतला.

मौजा हिक्केर व मौजा हिंदुर ही गावे महाराष्ट्र छत्तीसगड  सीमेवर असून अति नक्षल प्रभावी आहे. त्यामुळे अशा गावातून भरमार रायफल जमा झाल्याने ग्रामीण जनतेत  लोकशाही बद्दल व पोलीसांबद्दल सकारात्मक  दृष्टिकोन निर्माण झाल्याचे दिसत आहे. तसेच पोमकेच्या वतीने भरमार रायफल जमा करणाऱ्या ग्रामस्थांना पुष्पगुच्छ देऊन व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पोमकेचे प्रभारी अधिकारी योगेश दाभाडे पोउपनि देवरे, पोउपनि तनपुरे, गोपाले, बोरकर, खंदारे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. इतर गावकऱ्यांनी सुध्दा या गोष्टींचा आदर्श घेवून नक्षलविरोधी अभियानात सामिल होण्याचे आवाहन मा. पोलीस अधिक्षक सो. गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख यांनी केले आहे.

